मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# "सफाई अपनाओ, बिमारी भगाओ"

## महापालिकेची डेंग्यू मलेरियाच्या नायनाटासाठी जनजागृती मोहीम; आरोग्य विभागाचा उपक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'फ' क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह व अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या "सफाई अपनाओ, बिमारी भगाओ" या स्वच्छता व आरोग्य जनजागृती मोहिमेचा उत्साही शुभारंभ अटल बिहारी वाजपेयी उद्यान, पूर्णानगर येथे पार पडला.



या उपक्रमांतर्गत डेंग्यू व मलेरियासारख्या साथीच्या आजारांपासून बचावासाठी स्वच्छतेचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवणे व प्रतिबंधात्मक उपायांची माहिती देणे तसेच या उपक्रमाच्या अनुषंगाने महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे कीटकनाशक फवारणी, फॉगिंग मशीनद्वारे धूर फवारणी तसेच हँड स्प्रे उपकरणांद्वारे घराघरात औषध फवारणी देखील करण्यात येत आहे.

याप्रसंगी 'फ' क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, सहायक आरोग्य अधिकारी महेश आढाव, मुख्य आरोग्य निरीक्षक कांचनकुमार इंदलकर, तसेच आरोग्य निरीक्षक महिंद्र साबळे, गौरव दराडे, समाधान कातड, रामचंद्र शिंगाडे, आरोग्य सहाय्यक राहुल ककरोटी, आरोग्य मुकादम अनिल कांबळे, कैलास मांढरे, संतोष आरस्कर, कीटकनाशक मुकादम आगळे व महापालिका कर्मचारी आदी यावेळी उपस्थित होते.

> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत डेंग्यू व मलेरियाच्या प्रतिबंधासाठी फक्त औषध फवारणी बरोबरच जनजागृतीलाही तितकेच महत्त्व दिले जात आहे. नागरिकांनी महापालिकेस सहकार्य करावे.
>
> **- सचिन पवार, उप आयुक्त, आरोग्य विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

### सामाजिक संस्थांचा उत्स्फूर्त सहभाग

या मोहिमेमध्ये विविध शैक्षणिक संस्था व स्वयंसेवी संघटनांनी सक्रिय सहभाग नोंदवला. त्यामध्ये एएसएम कॉलेज ऑफ कॉमर्स, सायन्स अँड टेक्नॉलॉजी (पूर्णानगर), विद्यावेली कॉलेज (शिवतेजनगर), कृती विकास समिती, करुणा महिला बचत गट, सावित्रीबाई फुले महिला बचत गट, अमृतबिंदू बहुउद्देशीय संस्था, विश्वशांती बुद्ध विहार, नक्षत्र महिला बचत गट तसेच अरुण पाटोळे स्पोर्ट्स फाउंडेशन (पूर्णानगर) यांचा समावेश होता.

या सर्व संस्थांचा महापालिकेच्या वतीने सन्मान करण्यात आला. उपस्थित नागरिकांनी "सफाई अपनाओ, बिमारी भगाओ" ही स्वच्छतेची शपथ घेत आरोग्यविषयक सकारात्मक बदल घडवून आणण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

---


# हडपसर-यवत, तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्ग रुंदीकरणाला गती

## प्रकल्पासाठी 6 हजार 250 कोटींच्या निविदा जाहीर; वाहतूक समस्यांवर मिळणार दिलासा

**पिंपरी | प्रतिनिधी**

हडपसर ते यवत आणि तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गाच्या रुंदीकरणाला अखेर गती मिळाली आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत (MSRDC) या प्रकल्पासाठी सुमारे ६ हजार २५० कोटी रुपये खर्चाच्या निविदा जाहीर करण्यात आल्या आहेत. या कामांना राज्याचे नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजपा महायुती सरकारने विशेष प्राधान्य दिले असून, दोन स्वतंत्र भागांमध्ये ही विकासकामे हाती घेण्यात येणार आहेत.

हडपसर-यवत सहापदरी महामार्गासाठी ३,१४६.८५ कोटींची निविदा प्रसिद्ध करण्यात आली असून, या रस्त्यामुळे पुणे शहराच्या पूर्व भागातील वाहतूक प्रवाहाला मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच, तळेगाव-चाकण ते शिक्रापूर या महामार्गावर चाकणपर्यंत चारपदरी आणि पुढे सहापदरी रस्त्यासाठी ३,१२३.९२ कोटी रुपयांची निविदा जाहीर करण्यात आली आहे.




तळेगाव, चाकण, शिक्रापूर आणि यवत हे परिसर औद्योगिक आणि निवासी दृष्टिकोनातून झपाट्याने विकसित होत असून, वाढत्या वाहन संख्येमुळे दिवसेंदिवस वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर होत आहे. त्यामुळे या रस्त्यांच्या रुंदीकरणामुळे पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील औद्योगिक क्षेत्र, वसाहती, आयटी हब आणि नागरी वस्त्यांची कनेक्टिव्हिटी वाढून वाहतुकीवरील ताण कमी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

या प्रकल्पांची निविदा प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून कामाला सुरुवात व्हावी, अशी मागणी स्थानिक नागरीक, उद्योजक आणि लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत आहे. या विकासकामांमुळे पुणे जिल्ह्यातील वाहतूक व्यवस्थेला नवा आयाम मिळणार असून, दळणवळण अधिक सुलभ होणार आहे. पुणे, रायगड, अहिल्यानगर, नाशिक, संभाजीनगर या जिल्ह्यातील नागरिकांना या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा लाभ होणार आहे.

> हडपसर-यवत आणि तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गाच्या रुंदीकरणामुळे पुणे जिल्ह्यातील वाढत्या वाहतूक समस्येवर मोठ्या प्रमाणात दिलासा मिळणार आहे. विशेषतः चाकण, शिक्रापूर, तळेगाव औद्योगिक वसाहती आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील नागरिकांसाठी ही कनेक्टिव्हिटी अत्यंत महत्त्वाची आहे. मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपा महायुती सरकारने हे प्रकल्प वेगाने राबवण्याचा निर्णय घेतला आहे. निविदा प्रक्रिया जलद पूर्ण करून कामाला तातडीने सुरुवात व्हावी, ही आमची आग्रही मागणी आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# एकनाथ शिंदेंची 'जय गुजरात'ची घोषणा

## अमित शाहांच्या समोर शिंदेंची पुण्यात ‘जय महाराष्ट्र, जय गुजरात’ अशी घोषणा

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात मराठी-हिंदी वाद पेटला असतानाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासमोर जय गुजरात अशी घोषणा दिल्यामुळे आता नवा वाद पेटण्याची शक्यता आहे. पुण्यातील गुजराती समुदायाकडून जयराज स्पोर्ट्स व कन्व्हेन्शन सेंटरच्या उद्घाटन कार्यक्रमानिमित्त अमित शाह आणि एकनाथ शिंदे एकाच मंचावर एकत्र आले होते. यावेळी एकनाथ शिंदे यांनी भाषणाच्या शेवटी ‘जय महाराष्ट्र, जय गुजरात’, अशी घोषणा दिली.



एकनाथ शिंदे यांनी यावेळी २०२२ च्या सत्ताबदलाची पुन्हा एकदा आठवण करून दिली. ते म्हणाले, “अमित शाहांच्या रणनीती आणि नेतृत्वामुळे अशक्य ते शक्य करून दाखवले आहे. त्यांनी आव्हानांना संधीत बदलले आहे. त्यांच्या या कार्यक्षमतेचा मी स्वतः अनुभव घेतला आहे. त्यावेळी राज्यात सामान्य माणसाचे सरकार आणणे गरजेचे होते. त्यावेळी पंतप्रधान मोदींचे मार्गदर्शन होतेच. पण अमित शाह माझ्यामागे पर्वतासारखे ठामपणे उभे होते.”

“सरकार बदलणे सोपे काम नव्हते. पण जेव्हा देशाच्या, राज्याच्या विकासाचा प्रश्न असतो, तेव्हा अशी पाऊले उचलावी लागतात. यासाठी मी अमित शाहांचे खूप आभार मानतो. त्यांच्यामुळेच आमचे डबल इंजिनचे सरकार जोरात धावत आहे”, असेही एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

### जय गुजरात; एकनाथ शिंदेंची घोषणा

» एकनाथ शिंदे यांनी यावेळी अमित शाहांची स्तुती करण्यासाठी एक शेर ऐकून दाखवला. तो असा..
**“आपके बुलंद इरादोंसे तो चट्टाने भी डगमगाती है,**
**दुश्मन क्या चीज है, तुफानभी अपना रुख बदल देता है**
**आपके आनेसे यहाँ की हवा का नूर बदल जाता है,**
**आपके नाम से हर शख्स अदब से झुक जाता है”**
हा शेर सादर केल्यानंतर उपमुख्यमंत्री यांनी आपल्या भाषणाचा शेवट करताना ‘जय महाराष्ट्र, जय गुजरात’ अशी घोषणा दिली.

### अमित शाह महाराष्ट्राचे जावई

» **“अमित शाह हे गुजराती असले तरी ते महाराष्ट्राचे जावई आहेत. ते होम मिनिस्टर असले तरी त्यांच्या घरातील होम मिनिस्टर आपल्या कोल्हापूरच्या आहेत. त्यामुळे त्यांच्या घरात गुजराती आणि मराठी या दोन्ही भाषा आनंदाने नांदतात. महाराष्ट्र आणि गुजरातने विकास, उद्योग, संस्कृतीच्या क्षेत्रात देशाला नेहमीच दिशा दाखवली आहे”, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.**

# आयटीपार्कमधील समस्या 20 दिवसात सोडवा, अन्यथा आंदोलन

## 26 जुलै रोजी आंदोलन करण्याचा राष्ट्रवादीच्या (शरद पवार) खासदार सुप्रिया सुळे यांचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

राजीव गांधी आयटी पार्क परिसरात अनेक ठिकाणी नाल्यांवर बांधकामे झाली आहेत. त्यामुळे विस्कळीतपणा आला असून नागरी समस्यांमध्ये वाढ झाली. याला पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) जबाबदार आहे. पुढील २० दिवसात म्हणजेच २५ जुलैपर्यंत हिंजवडीतील परिस्थिती सुधारली नाही, तर २६ जुलै रोजी आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादीच्या (शरद पवार) खासदार सुप्रिया सुळे यांनी दिला.



हिंजवडीतील समस्यांवर चर्चेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे वेळ मागितली, पत्रही दिले. पण, आठवड्याला पुण्यात येणाऱ्या फडणवीस यांनी अद्यापही वेळ दिली नसल्याचा आरोपही त्यांनी केला. हिंजवडीतील नागरी समस्यांची खासदार सुळे यांनी शुक्रवारी पाहणी केली.

सकाळी साडेआठ वाजल्यापासून टप्पा एक, दोन, तीन, माणगाव, मारुंजी रस्ता, मेट्रो कारशेड जवळील रस्ता, भोईरवाडी या ठिकाणच्या रस्त्याची त्यांनी पाहणी केली. अभियंते, नागरिकांकडून समस्या जाणून घेतल्या. पाहणीनंतर हिंजवडी ग्रामपंचायतीच्या कार्यालयात त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

‘जागतिक पातळीवरील करोडे रुपयांचे व्यवहार हिंजवडीत होतात. सर्वाधिक महसूल येथून जातो. येथील समस्या हा राजकीय प्रश्न नाही’ असे सांगून खासदार सुळे म्हणाल्या, ‘या परिसरात मागील पाच वर्षांत प्रचंड बांधकामे झाली. काही बांधकामे नैसर्गिक नाल्यांवर झाली आहेत. त्यामुळे येथे विस्कळीतपणा आला. परिणामी, समस्या वाढल्या. त्यासाठी तातडीने नालेसफाई, मेट्रोच्या कामाचा राडारोडा हटवावा.

वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी शाळांच्या वेळेत काही बदल करता येईल का, याची चाचपणी करावी. जिल्हाधिकारी, पीएमआरडीए, एमआयडीसी, पिंपरी-चिंचवड महापालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण या सर्व प्रशासकीय यंत्रणा आणि स्थानिक लोकप्रतिनिधींसोबत मुख्यमंत्र्यांनी एकत्रित बैठक घेऊन मार्ग काढावा, अशी मागणी केली आहे. परंतु, फडणवीस यांच्याकडून वेळ मिळत नसल्याचा आरोप सुळे यांनी केला.

रस्त्यांसाठी ८० टक्के जागेचे भूसंपादन झाले असून २० टक्के बाकी आहे. पावसाळा संपल्यानंतर कामाला सुरुवात होईल. एका वर्षाच्या आत सर्व रस्ते होतील, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. उद्योगमंत्र्यांसोबत ८ जुलै रोजी बैठक होणार असल्याचे’ त्यांनी सांगितले. पूर्वी महिन्यातून एकवेळा येथे येत होते. या नागरी समस्या, वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत महिन्यातून दोनवेळा येणार असल्याचेही त्या म्हणाल्या.

### हिंजवडीबाबत संयुक्तिक वाटेल तो निर्णय घ्यावा

» **‘हिंजवडीचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश करण्याबाबत दोन मतप्रवाह आहेत. महापालिकेतील समावेशाबाबत नागरिकांचे मत महत्त्वाचे आहे. हिंजवडीला महापालिकेत समाविष्ट करावे किंवा हिंजवडी-माणची स्वतंत्र यंत्रणा करण्याबाबतचा पर्याय निवडावा. लोकांच्या मागणीनुसार शासनाने संयुक्तिक वाटेल तो निर्णय घ्यावा. हिंजवडी, माणमधील प्रश्न सोडविण्यासाठी निर्णय घेणारी स्वतंत्र यंत्रणा असावी’, असेही त्या म्हणाल्या.**

# मेट्रोच्या कामामुळे निगडी ते चिंचवड सेवा रस्त्याची चाळण

## दिवसभर वर्दळ अन् वाहतूककोंडी; खड्ड्यांमुळे वाढल्या अपघाताच्या घटना

**पिंपरी | प्रतिनिधी**

निगडीतील मधुकर पवळे पूल ते चिंचवड रेल्वे स्थानकापर्यंत सेवा रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत. मेट्रोच्या कामामुळे अवजड वाहनांची सतत रस्त्यावर वर्दळ सुरु असते. दिवसभर वाहतूक कोंडी दिसून येत आहे. सकाळी आणि सायंकाळी रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागत आहेत. वाहतूक नियंत्रण सिग्नल कालावधी अधिक असल्याने वाहतूक कोंडी आणखी भर पडत आहे. रस्त्यावरील खड्ड्यामुळे किरकोळ अपघाताची संख्या देखील वाढली आहे. त्यामुळे प्रवाशी, वाहनचालक आणि नागरिकांना खड्डे व वाहतूक कोंडीचा मनस्ताप सहन करावा लागत आहे.


पिंपरी-चिंचवड व पुण्याला जोडणारा हा मुख्य मार्ग आहे. जूना पुणे-मुंबई या महामार्गावर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. सकाळी व सायंकाळी तर वाहनांमध्ये आणखीनच भर पडते. मात्र, या मार्गावरील खड्ड्यांमुळे वाहन चालकांना प्रचंड कसरत करावी लागत आहे.

निगडीहून पिंपरीच्या दिशेने येताना रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. त्यामध्ये पावसाचे पाणी साचल्याने खड्ड्यात वाहने आदळतात. वाहनांचा वेग मंदावल्याने वाहतूक कोंडी नित्याची झाली आहे. सेवा रस्त्याची देखील दुरवस्था झाली आहे. या परिसरात अगोदरच रस्ता अरुंद आहे. अशातच परिसरातील खड्ड्यांमुळे आणखीनच वाहतूक कोंडी होते. या मध्ये वाहन चालक अडकून पडतात. या मार्गावर इतर ठिकाणीही खड्डे पडले आहेत.

निगडी ते पिंपरी मार्गावर महामेट्रोचे काम सुरू आहे. मेट्रोचे खांब उभारण्यासाठी खोदाई केली आहे. यासाठी सुरक्षा कठडे उभारले असून त्याच्या आत हे काम सुरू असते. या कामामुळे रस्त्याची रुंदी कमी झाली आहे. बीआरटी मार्गामध्ये जल वाहिनीची खोदाई सुरू आहे.

त्यामुळे पीएमपी बस सुद्धा सेवा रस्त्यावरूनच धावत आहेत. सेवा रस्त्याची रुंदी कमी झाल्याने यातून मार्ग काढताना वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे.

निगडी, आकुर्डी, चिंचवड, मोरवाडी या सर्व महत्त्वाच्या चौकांतील सिग्नलचा कालावधी अधिक असल्याने वाहनांच्या दूरपर्यंत रांगा लागत आहेत. सकाळी आणि सायंकाळच्या वेळी अर्धा किलोमीटर अंतरासाठी चालकांना वीस मिनिटे लागत आहेत.या रस्त्याचा उपयोग दररोज हजारो वाहन चालक करत असतात. पावसाळ्यात रस्त्याची अवस्था अधिकच बिकट झाली आहे.



### दुचाकी अपघाताच्या घटना

» निगडी ते चिंचवड सेवा रस्त्यावर या खड्यांमुळे अपघाताच्याही घटना घडत आहेत. खड्डे इतके आहेत की, त्यामधून मार्ग काढणेही दुचाकी चालकांना शक्य होत नाही. दरम्यान, खड्ड्यात दुचाकी आदळून दुचाकी चालक अक्षरशः कोलमडून रस्त्यावर पडतात. यामध्ये वाहन चालक जखमी झाल्याच्याही घटना घडल्या आहेत.

> “या रस्त्याने शाळकरी मुले, नोकरदार, ज्येष्ठ नागरिक यांची मोठी रहदारी असते. सकाळी मुलांना शाळेला सोडायला जाताना खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडी आणि अपघाताची भीती वाटते. प्रशासन गांभीर्याने लक्ष देऊन रस्ता खड्डे मुक्त करावा. रस्त्यावर पडलेले खड्डे तातडीने बुजवण्यात यावेत. अन्यथा आंदोलन करण्यात येईल.
>
> - रोहित काळभोर, सामाजिक कार्यकर्ता

> “हा रस्ता दुरूस्ती आणि देखभालीसाठी मेट्रो प्रशासनाकडे हस्तांतरित केला आहे. मेट्रोचे अधिकारी त्याच्या दुरुस्तीचे काम करत आहे. काही ठिकाणी खड्डे भरण्यासाठी पावसामुळे अडचणी निर्माण होत आहेत. महापालिका प्रशासन त्यावर लक्ष ठेवून आहे. पावसाने उघडीप दिली की पूर्ण रस्ता खड्डे मुक्त केला जाईल.
>
> - सुनील पवार, कार्यकारी अभियंता, दळणवळण विभाग, महापालिका


# वाहतूक पोलिसांच्या नावाने फसवणुकीचा सपाटा; मागील आठ दिवसांत 15 तक्रारी

## पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांकडे अशा प्रकारच्या तक्रारी दाखल झाल्या असून, पोलिसांनी नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाहतूक पोलिसांच्या नावाने मोबाईलवर बनावट चालान पाठवून नागरिकांची फसवणूक करण्याच्या प्रकारांनी जोर धरला आहे. सायबर चोरट्यांनी 'RTO TRAFFIC CHALLAN. APK' नावाची एक फाईल व्हॉट्सअप आणि इतर सोशल मीडियावरून नागरिकांना पाठवण्याचा सपाटा लावला आहे. ही फाईल डाऊनलोड केल्यानंतर मोबाईलमध्ये मालवेअर (व्हायरस) घुसतो आणि त्याचे नियंत्रण थेट सायबर गुन्हेगारांच्या ताब्यात जाते. यामुळे मोबाईलमधील वैयक्तिक आणि बँकिंग माहिती चोरली जाऊन आर्थिक नुकसान होत आहे. पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांकडे अशा प्रकारच्या तब्बल 15 तक्रारी मागील आठ दिवसांत दाखल झाल्या असून, पोलिसांनी नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

सायबर गुन्हेगारांकडून पाठवलेली 'रज्ञि' फॉरमॅटमधील ही बनावट फाईल मोबाईलमध्ये डाऊनलोड होताच, मोबाईलच्या ऑपरेटिंग सिस्टीममध्ये व्हायरस सक्रिय होतो. यानंतर मोबाईलचा पूर्ण ॲक्सेस गुन्हेगारांच्या हातात जातो. त्यामुळे ओटीपी, बँकिंग ॲप्स, यूपीआय व्यवहार, ई-मेल आयडी, संदेश, कॉल लॉग अशा गोपनीय माहितीवर त्यांना नियंत्रण मिळते. या माहितीचा वापर करून ते मोबाईलमधून थेट बँक खात्यांमध्ये पैसे ट्रान्सफर करतात, नवीन सिमकार्डसाठी विनंती करतात, मोबाईलमधील माहिती बदलतात किंवा काहीवेळा मोबाईल लॉक करून पैसेही मागतात.



### खरे चालान इथेच तपासा..

» वाहन चालानाबाबतची अधिकृत माहिती फक्त 'mahatrafficechallan.in', 'punetrafficpay.com या संकेतस्थळावरूनच मिळते. या वेबसाइटचा शेवट 'gov.in' असा असतो. याशिवाय 'com', 'org', 'in' अशा शेवट असलेल्या कोणत्याही वेबसाइट्सवरून चालान पाठवले जात असेल, तर त्या लिंक्स बनावट असण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे अशी कोणतीही लिंक किंवा फाईल आल्यास ती न उघडता तात्काळ डिलीट करून सायबर पोलिसांकडे तक्रार द्यावी.

तुमच्या वाहनावर दंड आहे, तुमच्यावर कोर्ट नोटीस आहे, तुमचा परवाना निलंबित होणार आहे, अशा आशयाचे मेसेज पाठवून रज्ञि फाईल अथवा लिंक उघडण्यास भाग पाडले जाते. नागरिक घाबरून ती फाईल उघडतात आणि त्यातून फसवणुकीची सुरुवात होते. या प्रकारात बनावट वेबसाइट्सचा वापर केल्याचेही समोर आले आहे.

# चाकणकरांचा आक्रोश न्यायालयात

## वाहतूकोंडीवर खेड वकील बार असोसिएशन उठवला आवाज

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील चाकण परिसरात पुणे – नाशिक आणि शिक्रापूर-तळेगाव राष्ट्रीय महामार्गावर होणाऱ्या नित्याची वाहतूक कोंडी आणि सततच्या जीवघेणे अपघात याबाबत मुंबई उच्च न्यायालयात खेड (राजगुरूनगर) वकील बार असोसिएशनच्या वतीने लवकरच जनहित याचिका दाखल करणार असून तसा आम्ही सर्व वकिलांनी ठराव केला आहे, अशी माहिती खेड वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. वैभव कर्वे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग आणि तळेगाव शिक्रापूर राष्ट्रीय महामार्गावर चाकण परिसरात होणारी दररोज मोठी वाहतूक कोंडी, मोठे जीवघेणे अपघात याबाबत केंद्रीय आणि राज्य पातळीवर दखल घेतली जात नाही. रोजच्या वाहतूक कोंडीला नागरिक पुरता वैतागला आहे. नोकरदार, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांसह वाहनचालक यांचे वाहतूक कोंडीत अतोनात हाल होत आहेत.

तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून बसावे लागते. त्यातच चाकण शिक्रापूर राष्ट्रीय महामार्ग हा अरुंद रस्ता नित्याच्या मोठ्या अपघातामुळे मृत्यूचा सापळा बनला आहे. या महामार्गावर अनेक अपघात होत असल्याने निष्पाप लोकांचे प्राण जात आहे. चाकण वाहतूक कोंडी आणि वाढते अपघात याबाबत राजगुरूनगर वकील बार असोसिएशनच्या वतीने बैठक घेऊन मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा ठराव घेण्यात आला. त्यानंतर पत्रकार परिषद घेण्यात आली.



### लोकप्रतिनिधी याबाबत पडताहेत कमी

» चाकण येथे जागतिक दर्जाची एमआयडीसी आहे. त्यात काम करणारा व पुणे-मुंबई येथे जाणारा नोकरवर्ग मोठा आहे. शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुण्यात शिक्षणासाठी या महामार्गावरून जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. चाकण येथे पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर दररोज वाहतूक कोंडी नित्याची आहे त्यातच तळेगाव-शिक्रापूर राष्ट्रीय महामार्ग रस्ता अरुंद असल्याने आणि त्यावर खड्डे पडल्याने जीवघेणे अपघात होत आहेत. लोकप्रतिनिधी याबाबत कमी पडत आहेत. राज्य आणि केंद्र सरकार या महत्त्वाच्या विषयाकडे लक्ष देत नाही. या ज्वलंत प्रश्नावर खेड बार असोसिएशनच्या हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार आहात, असे अॅड. कर्वे यांनी नमूद केले.

### वाहतूक कोंडी, अपघातांमुळे नागरिक हैराण

» पुणे-नाशिक आणि शिक्रापूर-तळेगाव राष्ट्रीय महामार्गावर चाकण परिसरात दररोज होणारी वाहतूक कोंडी आणि वारंवार घडणारे जीवघेणे अपघात यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. नोकरदार, विद्यार्थी आणि सर्वसामान्यांना तासन्तास वाहतूक कोंडीत अडकावे लागत आहे. विशेषत: शिक्रापूर-तळेगाव मार्गावरील अरुंद रस्ता अपघातांचे प्रमुख कारण बनला असून, येथे वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे अनेकांचे बळी गेले आहेत. या गंभीर समस्येकडे केंद्र आणि राज्य सरकारचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे.

### जनहित याचिकेचा ठराव आणि पुढील पावले

» या समस्येवर तोडगा काढण्यासाठी राजगुरुनगर वकील बार असोसिएशनने गुरुवार, दि. ३ जुलै रोजी बैठक घेऊन मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा ठराव मंजूर केला. पत्रकार परिषदेत ॲड. वैभव कर्वे यांनी वाहतूक कोंडी आणि अपघातांबाबत चिंता व्यक्त करत याचिका दाखल करण्याचे उद्दिष्ट स्पष्ट केले. यावेळी असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड. शंकर कोबल, सचिव ॲड. नवनाथ कड, माजी अध्यक्ष ॲड. अनिल राक्षे, ज्येष्ठ वकील ॲड. सी. एस. सांडभोर, ॲड. मनिषा पवळे, ॲड. विक्रम कड, ॲड. सुभाष करंडे, ॲड. मनोहर जंबुकर, ॲड. अरुण मुळूक, ॲड. आरती सैद, ॲड. रुकसाना पठाण, ॲड. प्रवीण बोंबले, ॲड. दीपक थिगळे, ॲड. करण कांबळे आणि ॲड. मीनानाथ साबळे उपस्थित होते.

# भीमाशंकर कारखान्यास “वसंतदादा पाटील सर्वोत्कृष्ट साखर कारखाना” पुरस्कार प्रदान

## पुरस्कार केंद्रीय अन्न व सार्वजनिक वितरण आणि ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे प्रदान

**पुणे | प्रतिनिधी**

पारगाव (ता.आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्यास नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑप शुगर फॅक्टरीज लि., नवी दिल्ली यांचा सन २०२३-२४ करीता देशातील “वसंतदादा पाटील सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखाना” पुरस्कार केंद्रीय अन्न व सार्वजनिक वितरण आणि ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला. कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रदीप वळसे पाटील व कार्यकारी संचालक चंद्रकांत ढगे यांनी स्वीकारला.

नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑप शुगर फॅक्टरीज लि., नवी दिल्ली यांनी गुरुवार, दि. ३ रोजी सन २०२३-२४ राष्ट्रीय कार्यक्षमता पुरस्कार” सोहळा आयोजित करून देशातील सहकारी व खाजगी साखर कारखान्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी केंद्रीय अन्न व सार्वजनिक वितरण आणि ग्राहक व्यवहार राज्य मंत्री निमुबेन बांभनिया, माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, हरियाणाचे सहकार मंत्री डॉ. अरविंद कुमार शर्मा, उत्तर प्रदेश राज्याचे ऊस विकास मंत्री लक्ष्मी नारायण चौधरी, नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑप शुगर फॅक्टरीजचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, उपाध्यक्ष केतनभाई पटेल, कार्यकारी संचालक प्रकाश नाईकनवरे तसेच देशातील साखर उद्योगातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे पुरस्काराबाबत माहिती देताना म्हणाले, कारखान्याचे संस्थापक व महाराष्ट्र राज्याचे माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक वर्षात केलेली ऊस उत्पादकता, तांत्रिक गुणवत्ता, वित्तीय व्यवस्थापन, अधिकतम ऊस गाळप, साखर उतारा, ऊस वाढीच्या योजना, कर्ज परतफेड, व्याज, खर्चात केलेली बचत, कमीत कमी उत्पादन खर्च, केलेली गुंतवणूक,

वेळेत अदा केलेला ऊस दर, ऊस उत्पादकांना दिलेली ठेवीची पासबुके, संचित नफा, कारखान्याचे नक्त मुल्य, शिल्लक कर्ज उभारणी मर्यादा, कारखान्याने उभारणी केलेला व उपलब्ध निधी, विनियोगासाठी केलेले नियोजन, शिक्षण क्षेत्रातील योगदान व सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून केलेली कामे या सर्व बाबींचा विचार करून कारखान्यास हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.




### वळसे-पाटील यांच्या नेतृत्वामुळे यश शक्य

» कारखान्याचे संस्थापक व माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांचे दूरदृष्टी नेतृत्व व मार्गदर्शन, संचालक मंडळाचे धोरण, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सुयोग्य व्यवस्थापन, ऊस उत्पादक व सभासद वर्गाची साथ यामुळेच पुरस्कार प्राप्त करणे शक्य झाले आहे. आजपर्यंत कारखान्यास देश पातळीवरील १३ व राज्य पातळीवरील १६, असे एकूण २९ पुरस्कार प्राप्त झालेले आहे. “देशातील वसंतदादा पाटील सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखाना पुरस्कार” ७ वेळा मिळविणारा देशातील एकमेव साखर कारखाना आहे, अशी माहिती उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांनी दिली.